# श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियान संपन्न

**महाविद्यालय संकेतांक ४१९**

वाचन हे समृद्धीचे दार उघडते" या विश्वासावर आधारित ' वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राज्यातील वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या अभियानाचा उद्देश विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील प्रत्येक घटकांना वाचनाची गोडी लावणे व नव्या ज्ञानाच्या दारात प्रवेश देणे आहे. वाचन संस्कृतीच्या विकासाकरिता तसेच तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाद्वारे राज्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या उपक्रमाच्या अंतर्गत श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालय सवना द्वारे दि. १ जानेवारी २०२३ ते १५ जानेवारी २०२३ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथप्रदर्शन व सामूहिक वाचन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात मोठ्या संख्येत विद्यार्थी सहभागी झालेत . या प्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केलेल्या ग्रंथांपैकी आवडीचा एक ग्रंथ निवडून एक तास वाचन केले. सुरुवातीला महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. सुरेल झोड यांनी वाचन संकल्प उपक्रमाची भूमिका विशद करून वाचनाचे महत्व तसेच ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या अवांतर विषयांवरील वाचन साहित्याची माहिती विद्यार्थ्यांसमोर मांडली. नवीन वर्षात अधिकाधिक वाचन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. तर प्राचार्य डॉ महल्ले यांनी आजच्या मोबाइलच्या युगात पुस्तक वाचन काळाची गरज यावर प्रकाश टाकला सदर वाचन सप्ताहात राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकार प्रा.नासीर शेख, प्रा डॉ पंकज वामनराव चौधरी यांनी पुढाकार घेत ग्रंथालय विभागाच्या साफसफाई ची धुरा सांभाळत

प्राचार्य डॉ. महल्ले मार्गदर्शनात ग्रंथपाल डॉ. सुरेल झोड तसेच सर्व ग्रंथालय कर्मचारी व रा. से.यो. च्या स्वयंसेवकांनी 'वाचन संकल्प उपक्रम' कार्यक्रम यशस्वी केला.




वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर









पुस्तक प्रदर्शनीत सहभागी विद्यार्थी




वाचन संकल्प महाराष्ट्राचा

रासेयो कार्यक्रम अधिकारी

प्राचार्य